# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2539223, Ph.2539214/212/250/118/6659214/212/250/118

**Email:** preexam@muhs.ac.in coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

MUHS

डॉ.अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
**परीक्षा नियंत्रक**

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations


**जा.क्र. :मआविवि/एक्सपी/०८/ ३३३८-अ/२०२१** **दि.१९/०५/२०२१**

## कार्यालयीन परीपत्रक

**प्रति,**
**अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक**
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
मआविवि, नाशिक

**विषय :** **विद्यापीठ हिवाळी-२०२० लेखी परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत...**
**संदर्भ :** १. विद्यापीठ परीपत्रक क्र.६९/२०२० दि.०६/१०/२०२०( Programme of Examinations)
२. विद्यापीठ कार्यालयीन परीपत्रक क्र.मआविवि/एक्सपी/१९३९B/२०२१दि.१२/०३/२०२१
३. विद्यापीठ कार्यालयीन. परीपत्रक क्र.मआविवि/एक्सपी/२६७०A/२०२१दि.१५/०४/२०२१

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ हिवाळी-२०२० लेखी परीक्षेबाबतची विस्तृत माहिती असलेली माहितीपुस्तिका (Programme of Examinations) संदर्भीय परीपत्रक क्र.६९/२०२० अन्वये व लेखी परीक्षांचे वेळापत्रक संदर्भीय कार्यालयीन परीपत्रकान्वये विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात आलेले होते. तथापि टप्पा क्र. ३ मधील उर्वरित पदवी अभ्यासक्रम व विद्यापीठ पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या (Remaining UG Courses i.e. I,II,III year and University UG/PG/Certificate Courses) लेखी परीक्षा कोव्हिड-१९ या संसर्गजन्य विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे खालीलप्रमाणे पुर्ननियोजित (Reschedule) करण्यात येत आहे.

| Winter-2020 Examinations | Earlier Date of Commencement | Rescheduled date of Commencement |
|---|---|---|
| **Phase-III :** Remaining UG Courses i.e. I,II,III year and University UG/PG/Certificate Courses | w.e.f. 02/06/2021 | w.e.f. 10/06/2021 |

उपरोक्त लेखी परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक या परीपत्रकाच्या शेवटी दर्शविलेल्या लिंकवर प्रसिध्द करण्यात येईल.

कोव्हिड-१९ आजाराच्या प्रादुर्भावामुळे तसेच राज्य शासनाच्या वेळोवेळी प्राप्त निर्देशान्वये उपरोक्त अंतिम वेळापत्रक प्रसिध्द करण्यात येत असून शासनाच्या वेळोवेळी परिस्थितीनुरुप धोरणान्वये परीक्षा संचलन करण्यात येईल. कृप्या विद्यार्थ्यांनी परीक्षेसंदर्भात कोणत्याही अफवांवर/सामाजिक माध्यमांवर (Social Media) विश्वास न ठेवता, परीक्षेसंदर्भातील अद्ययावत माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला (www.muhs.ac.in) भेट द्यावी.

सर्व महाविद्यालयांनी उपरोक्त बाबतची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना सुचित करावे व आपल्या महाविद्यालयांच्या सूचनाफलकांवर सदर परीपत्रकास ठळक प्रसिध्दी द्यावी.

Maharashtra University of Health Sciences MUHS

(डॉ. अ. ग. पाठक)
**परीक्षा नियंत्रक**

**सोबत :** हिवाळी-२०२० टप्पा क्र. ३ (Remaining UG Courses i.e. I,II,III year and University UG/PG/ Certificate Courses) परीक्षा वेळापत्रक (येथे दि.२०/०५/२०२१ पासून क्लिक करावे).